8880

---

**वाचले:-** 1] मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचेकडील आदेश क्र.रानिआ/ग्रापंनि-2017/प्र.क्र.01/का-8, दि. 01.06.2017

2] अध्यक्ष प्रभाग रचना समिती तथा तहसीलदार वैभववाडी यांचेकडील दि. 03.07.2017 ची नमुना "ब" ( नियम 5 (2) पहा) मधील नोटीस / अधिसूचना

3] श्री. आत्माराम पांडुरंग खाडये, शिवसेना विभागप्रमुख, रा.नानिवडे, ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग यांनी दि. 11.07.2017 रोजी अध्यक्ष प्रभाग रचना समिती तथा तहसीलदार वैभववाडी यांचेकडे सादर केलेली हरकत.

4] उपविभागीय अधिकारी (महसूल), कणकवली यांचेकडील पत्र क्र. ग्रा.पं./प्रभाग रचना/07/2017 दि. 24.07.2017

---

**हरकत क्रमांक - 02**

क्र.साशा/डेस्क-1(3)/ग्रा.पं.नि./7/2017
जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग
दुरध्वनी क्र. 02362-228608
ईमेल - collroffice@gmail.com
दिनांक:- जुलै, 2017

श्री. आत्माराम पांडुरंग खाडये, शिवसेना विभागप्रमुख,
रा.नानिवडे, ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग

**विरुध्द**

अध्यक्ष प्रभाग रचना समिती तथा
तहसीलदार वैभववाडी

**ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूका- 2017**

प्रभाग रचना व आरक्षण यावरील हरकती

ज्याअर्थी, मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचेकडील वाचले क्र. 1 अन्वये माहे ऑक्टोबर 2017 ते फेब्रुवारी, 2018 या कालावधीत मुदत संपणा-या तसेच नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी ऑनलाईन प्रभाग रचना व आरक्षणाचा कार्यक्रम निश्चित करण्यात आलेला आहे. त्या अन्वये अध्यक्ष, प्रभाग रचना समिती तथा तहसीलदार वैभववाडी यांनी वाचले क्र. 2 अन्वये ग्रामपंचायत नानिवडे, ता. वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग चे ग्रामपंचायत निवडणूकसाठी प्रभाग रचना व आरक्षणाबाबत नमुना "ब" ( नियम 5 (2) पहा) मधील नोटीस / अधिसूचना प्रसिध्द केलेली होती. मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचेकडील वाचले क्र. 1 मधील कार्यक्रमानुसार प्रभाग रचना व आरक्षणाबाबत दि. 11.07.2017 पर्यंत हरकती दाखल करणेसाठी मुदत देणेत आलेली होती. त्यानुसार श्री. आत्माराम पांडुरंग खाडये, शिवसेना विभागप्रमुख, रा.नानिवडे, ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग यांनी ग्रामपंचायत नानिवडे, ता. वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग चे ग्रामपंचायतीचे प्रभाग रचनाबाबत खालील प्रमाणे हरकत घेतलेली आहे.

**हरकत तपशील -**

**"ग्रामपंचायत प्रभाग रचनेमध्ये प्रभाग क्रमांक 01 मध्ये वाडेकरवाडी, ब्राम्हणवाडी, पुरणवाडी तसेच प्रभाग क्रमांक 02 मध्ये बेळेकरवाडी, वाणीवाडी, बौध्दवाडी व प्रभाग क्रमांक 03 मध्ये शिवगणवाडी, उडकरवाडी, कातकरवाडी, तांबळवाडी अशाप्रकारे वाड्या सामाविष्ट करणेबाबत"**

उपरोक्त हरकती बाबत उपविभागीय अधिकारी (महसूल), कणकवली यांचेकडे दि. 20.07.2017 रोजी सुनावणी घेणेत आलेली असून उक्त सुनावणीस हरकतदार श्री. आत्माराम पांडुरंग खाडये, शिवसेना विभागप्रमुख, हे गैरहजर होते. उपविभागीय अधिकारी (महसूल), कणकवली यांनी उक्त हरकतीवर खालील प्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

**उपविभागीय अधिकारी (महसूल), कणकवली यांचे अभिप्राय-**

"सदरच्या प्रभागाची रचना ही रोटेशन पध्दतीनुसार व गावच्या दक्षिण दिशेकडून सुरूवात करून परत त्याच देशेला शेवट करावयाचा आहे अशा पध्दतीत केलेली आहे तसेच अर्जदार यांच्या निवेदनानुसार प्रभाग रचना केल्यास दक्षिण-पश्चिम व उत्तर-पूर्व असा सलगपणा राखला जात नाही त्यामुळे सदरची प्रभाग रचना बरोबर आहे. सबब हरकतदार श्री. आत्माराम पांडुरंग खाडये, शिवसेना विभागप्रमुख, रा.नानिवडे यांची हरकत फेटाळणे योग्य होईल."

अर्जदार यांनी घेतलेली हरकत व उपविभागीय अधिकारी (महसूल), कणकवली यांनो दिलेले अभिप्राय तसेच मा. राज्य निवडणूक आयोगाकडील वाचले क्र. 1 नुसार देण्यात आलेले निर्देश व वेळावेळी दिलेल्या सुचना तसेच भौगोलिक सलगता विचारात घेऊन मी उदय चौधरी, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग खालील प्रमाणे निर्णय देत आहे.

**-: आदेश :-**

**01. हरकतदार यांची हरकत फेटाळण्यात येत आहे.**

**02.** अध्यक्ष, प्रभाग रचना समिती तथा तहसीलदार वैभववाडी यांनी ग्रामपंचायत नानिवडे, ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग चे ग्रामपंचायत निवडणूककामी प्रभाग रचना व आरक्षणाबाबत नमुना "ब" ( नियम 5 (2) पहा) मधील दि. 03.07.2017 रोजी प्रसिध्द केलेली नोटीस / अधिसूचनेनुसार उक्त ग्रामपंचायतीची प्रभाग रचना व आरक्षण कायम ठेवण्यात येत आहे.

( उदय चौधरी )
जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग

**प्रतिलीपीः-** श्री. आत्माराम पांडुरंग खाडये, शिवसेना विभागप्रमुख, रा.नानिवडे, ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग

**प्रतः-**

1. मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- 400032 यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
2. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई (नगरपालिका प्रशासन शाखा) यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
3. उपविभागीय अधिकारी (महसूल), कणकवली यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी.
4. अध्यक्ष प्रभाग रचना समिती तथा तहसीलदार वैभववाडी यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी.

8881)

---

**वाचले:-** 1] मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचेकडील आदेश क्र.रानिआ/ग्रापंनि-2017/प्र.क्र.01/का-8 दि. 01.06.2017

2] अध्यक्ष प्रभाग रचना समिती तथा तहसीलदार वैभववाडी यांचेकडील दि. 03.07.2017 ची नमुना "ब" ( नियम 5 (2) पहा) मधील नोटीस / अधिसूचना

3] श्री. मनोहर विश्राम खाडये वगैरे 5, रा.नानिवडे, ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग यांनी दि. 11.07.2017 रोजी अध्यक्ष प्रभाग रचना समिती तथा तहसीलदार वैभववाडी यांचेकडे सादर केलेली हरकत.

4] उपविभागीय अधिकारी (महसूल), कणकवली यांचेकडील पत्र क्र. ग्रा.पं./प्रभाग रचना/07/2017 दि. 24.07.2017

---

**हरकत क्रमांक - 01**

क्र.साशा/डेस्क-1(3)/ग्रा.पं.नि./7/2017
जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग
दुरध्वनी क्र. 02362-228608
ईमेल - collroffice@gmail.com
दिनांकः- जुलै, 2017

श्री. मनोहर विश्राम खाडये वगैरे 5,
रा.नानिवडे, ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग

**विरुध्द**

अध्यक्ष प्रभाग रचना समिती तथा
तहसीलदार वैभववाडी

**<u>ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूका- 2017</u>**

प्रभाग रचना व आरक्षण यावरील हरकती

ज्याअर्थी, मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचेकडील वाचले क्र. 1 अन्वये माहे ऑक्टोबर, 2017 ते फेब्रुवारी, 2018 या कालावधीत मुदत संपणा-या तसेच नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी ऑनलाईन प्रभाग रचना व आरक्षणाचा कार्यक्रम निश्चित करण्यात आलेला आहे. त्या अन्वये अध्यक्ष, प्रभाग रचना समिती तथा तहसीलदार वैभववाडी यांनी वाचले क्र. 2 अन्वये ग्रामपंचायत नानिवडे, ता. वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग चे ग्रामपंचायत निवडणूककामी प्रभाग रचना व आरक्षणाबाबत नमुना "ब" ( नियम 5 (2) पहा) मधील नोटीस / अधिसूचना प्रसिध्द केलेली होती. मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचेकडील वाचले क्र. 1 मधील कार्यक्रमानुसार प्रभाग रचना व आरक्षणाबाबत दि. 11.07.2017 पर्यंत हरकती दाखल करणेसाठी मुदत देणेत आलेली होती. त्यानुसार श्री. मनोहर विश्राम खाडये वगैरे 5, रा.नानिवडे, ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग यांनी ग्रामपंचायत नानिवडे, ता. वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग चे ग्रामपंचायतीचे प्रभाग रचनाबाबत खालील प्रमाणे हरकत घेतलेली आहे.

**हरकत तपशील -**

**"नव्याने तयार करण्यात आलेल्या प्रभाग रचनेनुसार ग्रामपंचायत प्रभाग रचनेमध्ये कुरणवाडी ही प्रभाग क्रमांक 01 मध्ये न ठेवता प्रभाग क्रमांक 03 मध्ये समाविष्ट करावी."**

उपरोक्त हरकती बाबत उपविभागीय अधिकारी (महसूल), कणकवली यांचेकडे दि. 20.07.2017 रोजी सुनावणी घेणेत आलेली असून उक्त सुनावणीस हरकतदार श्री. मनोहर विश्राम खाडये वगैरे 5 हे उपस्थित होते. उपविभागीय अधिकारी (महसूल), कणकवली यांनी उक्त हरकतीवर खालील प्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

**उपविभागीय अधिकारी (महसूल), कणकवली यांचे अभिप्राय-**

" सदरच्या प्रभागाची रचना ही रोटेशन पध्दतीनुसार व गावच्या दक्षिण दिशेकडून सुरूवात करून परत त्याच दिशेला शेवट करावयाचा आहे. अशा पध्दतीत केलेली आहे. तसेच कुरणवाडी प्रभाग क्र.3 मध्ये समाविष्ट केल्यास, प्रभाग क्र.1 ची लोकसंख्या 16.19% पटीने कमी होते. त्यामुळे प्रभाग निहाय लोकसंख्येचा समतोलपणा राखला जात नाही. त्यामुळे सदरची प्रभाग रचना बरोबर आहे. सबब हरकतदार श्री. मनोहर विश्राम खाडये वगैरे 5 यांची हरकत फेटाळणे योग्य होईल."

अर्जदार यांनी घेतलेली हरकत व उपविभागीय अधिकारी (महसूल), कणकवली यांनी दिलेले अभिप्राय तसेच मा. राज्य निवडणूक आयोगाकडील वाचले क्र. 1 नुसार देण्यात आलेले निर्देश व वेळावेळी दिलेल्या सुचना तसेच भौगोलिक सलगता विचारात घेऊन मी उदय चौधरी, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग खालील प्रमाणे निर्णय देत आहे.

## -: आदेश :-

**01. हरकतदार यांची हरकत फेटाळण्यात येत आहे.**

**02.** अध्यक्ष, प्रभाग रचना समिती तथा तहसीलदार वैभववाडी यांनी ग्रामपंचायत नानिवडे, ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग चे ग्रामपंचायत निवडणूककामी प्रभाग रचना व आरक्षणाबाबत नमुना "ब" ( नियम 5 (2) पहा) मधील दि. 03.07.2017 रोजी प्रसिध्द केलेली नोटीस / अधिसूचनेनुसार उक्त ग्रामपंचायतीची प्रभाग रचना व आरक्षण कायम ठेवण्यात येत आहे.

( उदय चौधरी )
जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग

**प्रतिलीपीः-** श्री. मनोहर विश्राम खाडये वगैरे 5, रा.नानिवडे, ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग

**प्रतः-**
1. मा. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- 400032 यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
2. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई ( नगरपालिका प्रशासन शाखा ) यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
3. उपविभागीय अधिकारी (महसूल), कणकवली यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी.
4. अध्यक्ष प्रभाग रचना समिती तथा तहसीलदार वैभववाडी यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी.